RNI No. MAHBIL/2009/40124

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ४, अंक १९ (३)] गुरुवार, जुलै १९, २०१८/आषाढ २८, शके १९४० [पृष्ठे ९, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ५१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **१९ जुलै, २०१८** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LXI OF 2018.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF FEE) ACT, 2011.

**सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६१.**

**महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२०१४ चा महा. ७. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी** भारतीय गणराज्याच्या एकोणसत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०१८, असे संक्षिप्त नाव म्हणावे.



भाग पाच—५१—१.
एचबी–१७५३–१..

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मध्ये,– २०१४ चा महा. ७

(१) खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल:—

"(क-१) "व्यथित पालकांचा गट" याचा अर्थ, या अधिनियमाखालील कोणत्याही निर्णयामुळे जे व्यथित झालेले आहेत, अशा बाधा पोहोचलेल्या इयत्तेचा किंवा, यथास्थिति, शाळेच्या २५ टक्क्यांपेक्षा कमी नसतील इतके एकूण पालक असलेला बालकांच्या पालकांचा गट, असा आहे; ";

(२) खंड (ञ) ऐवजी, पुढील खंड बदली दाखल करण्यात येईल :—

"(ञ) "शुल्क" याचा अर्थ, कलमे ५ आणि ६ अन्वये शुल्क म्हणून निश्चित केली असेल अशी कोणतीही रक्कम, असा आहे आणि त्यामध्ये,—

(एक) आवश्यक अभ्यासक्रमासह शिकवणी शुल्क;

(दोन) सत्र शुल्क, जे प्रत्येक सत्रासाठी एका महिन्याच्या शिकवणी शुल्कापेक्षा अधिक नसेल;

(तीन) ग्रंथालय शुल्क;

(चार) प्रयोगशाळा शुल्क;

(पाच) जिमखाना शुल्क;

(सहा) तारण धन;

**स्पष्टीकरण.—** "तारण धन" याचा अर्थ, प्रयोगशाळेतील उपकरणे हाताळणे किंवा त्याचे नुकसान होणे या प्रयोजनांसाठी, ग्रंथालय अनामत रक्कम म्हणून आणि क्रीडा साहित्य या करिता ठेवलेली अनामत रक्कम, असा आहे;

(सात) परीक्षा शुल्क;

(आठ) वसतिगृह शुल्क व भोजनालय शुल्क;

(नऊ) प्रवेश शुल्क.

**स्पष्टीकरण १.—** विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या शाळेत इयत्ता पहिलीपासून सुरू होणा-या ते इयत्ता दहावीपर्यंत किंवा त्याखालील कोणत्याही वर्गापर्यंत शिक्षणाची सुविधा आहे, त्या शाळेत त्या विद्यार्थ्यांना इयत्ता पहिली पासून सुरु होणा-या ते इयत्ता दहावीपर्यंत किंवा त्याखालील कोणत्याही वर्गापर्यंत प्रवेश शुल्क देण्याची आवश्यकता असणार नाही.

**स्पष्टीकरण २.—** प्रवेश शुल्क हे, एक महिन्याच्या शिकवणी शुल्कापेक्षा अधिक असणार नाही;

(दहा) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणत्याही अभ्यासक्रम विषयक किंवा अभ्यासांतर्गत बाबीकरिता द्यावयाची अनामत रक्कम वा रक्कम;

(अकरा) शाळेकडून पुरविण्यात येणा-या कोणत्याही अभ्यासक्रमविषयक किंवा अभ्यासांतर्गत उपक्रमासाठी किंवा सुविधांसाठी विद्यार्थ्यांकडून देय असणारी कोणतीही इतर रक्कम, यांचा समावेश होतो;".

(३) खंड (थ) वगळण्यात येईल.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल:– सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ यात नवीन कलम ३क समाविष्ट करणे.

"**३-क.** (१) शाळा व्यवस्थापनाद्वारे ठरविण्यात येईल त्याप्रमाणे पालकांकडून मासिक किंवा द्विमासिक किंवा तिमाही शुल्क प्रदान करण्यात येईल : शुल्क प्रदान करणे आणि विलंबाने प्रदान करणे किंवा प्रदान न करणे यासाठी शास्ती.

परंतु, बालकांचे पालक सहामाही किंवा वार्षिक शुल्काचे प्रदान करण्यास इच्छुक असतील तर, शाळा व्यवस्थापन पालकांना त्यानुसार शुल्क प्रदान करण्याची परवानगी देईल आणि त्यांच्या स्वेच्छा निर्णयानुसार त्यासाठी सवलत देता देईल.

(२) खाजगी विनाअनुदानित शाळांचे आणि कायम विनाअनुदानित शाळांचे व्यवस्थापन, शिक्षार्थ व्याजासह विलंब प्रदान शुल्क किंवा समयोत्तर प्रदान शुल्क आकारण्यासाठी हक्कदार असेल. शिक्षार्थ व्याजाचा दर, शासनाने आदेशाद्वारे ठरविल्याप्रमाणे असेल.".

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मधील, पोट-कलम (२) च्या खंड (क) मध्ये ,— सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ४ ची सुधारणा.

(१) उपखंड (चार) मधील, "पालकांमधून दोन्ही" या मजकुराऐवजी "एक पालक व एक शिक्षक" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) उपखंड (पाच) मध्ये, "प्रत्येक इयत्तेतील एक पालक व एक शिक्षक" या मजकुराऐवजी, प्रत्येक इयत्तेतील किमान एक पालक, आणि शाळेचे कमाल तेरा पालक यास अधीन राहून प्रत्येक इयत्तेतील दोन पेक्षा अधिक नसतील इतके पालक, कमाल दहा शिक्षक यास अधीन राहून प्रत्येक इयत्तेतील एक शिक्षक आणि शाळेच्या व्यवस्थापनाचा एक प्रतिनिधी" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(३) उपखंड (पाच) नंतर, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :—

"परंतु, पालक सदस्यांची एकूण संख्या ही, नेहमी एकूण शिक्षक सदस्यांची संख्या आणि शाळा व्यवस्थापनाचे प्रतिनिधी असलेले सदस्य यांच्या एकूण संख्येपेक्षा एक या संख्येने अधिक असेल:

परंतु आणखी असे की, जर विद्याविषयक वर्षात, उपखंड (पाच) अन्वये सदस्य म्हणून कार्यकारी समितीवर कोणत्याही इयत्तेतील दोन पालकांची नियुक्ती करण्यात आली असेल तर, अशा बाबतीत पुढील एका वर्षासाठी अशा इयत्तेतून एकापेक्षा अधिक पालकांची नियुक्ती करण्यात येणार नाही.".

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मध्ये,— सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ यांच्या कलम ६ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :—

" (१क) खाजगी विनाअनुदानित शाळा आणि कायम विनाअनुदानित शाळा यांच्या व्यवस्थापनास, विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या वेळी, पालकांसाठी सर्व इयत्तांकरिता म्हणजे इयत्ता पहिली ते इयत्ता दहावी किंवा विभागून म्हणजे पहिला भाग समाविष्ट असलेला इयत्ता पहिली ते पाचवी आणि दुसरा भाग समाविष्ट असलेला इयत्ता सहावी ते दहावी यासाठी इयत्तानिहाय शुल्क संरचना घोषित करण्याची निवड करता येईल. जर भागनिहाय शुल्क संरचना घोषित केली असेल तर मात्र, उर्वरित भागासाठीची शुल्कसंरचना, ते विद्याविषयक वर्ष सुरु होण्याच्या किमान एका वर्षाआधी घोषित करण्यात येईल. शाळेने घोषित केलेली अशी शुल्क संरचना, सर्व संबंधितांसाठी बंधनकारक असेल. शाळेचे व्यवस्थापन, सदर शुल्क संरचना, शाळेच्या सूचना फलकावर व अधिकृत संकेतस्थळावरही प्रदर्शित करील.

(१ख) पोट-कलम (१क) खालील तरतुदीनुसार शुल्कसंरचना घोषित करण्याची निवड ज्या खाजगी विनाअनुदानित शाळांच्या व कायम विनाअनुदानित शाळांच्या व्यवस्थापनाने केलेली नसेल ते शाळा व्यवस्थापन मागील विद्याविषयक वर्षाचे शुल्क, अधिक त्यात उक्त शुल्काच्या पंधरा टक्क्याइतकी रक्कम यापेक्षा अधिक नसेल, इतके शाळेचे शुल्क प्रस्तावित करण्यास पात्र असेल :

परंतु, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांना, कार्यकारी समितीने किंवा, यथास्थिति, विभागीय शुल्क नियामक समितीने शुल्कास मान्यता दिल्याच्या दिनांकापासून दोन वर्षानंतर शुल्क वाढवता येईल.

(१ग) शाळा व्यवस्थापनास, अकल्पित प्रसंगी ७६ टक्के पालकांहून कमी नसतील इतक्या पालकांची मान्यता घेऊन किंवा कार्यकारी समितीच्या मान्यतेने, त्याबाबतची कारणे किंवा परिस्थिती सादर करून, पोट-कलम (१क) मध्ये नमूद केलेल्या शुल्क संरचनेमध्ये तरतूद करण्यात आलेल्या शुल्कात वाढ करता येईल किंवा पोट-कलम (१ख) मध्ये तरतूद केलेल्या दरापेक्षा उच्चतर दराने किंवा पोट-कलम (१ख) च्या परंतुकामध्ये तरतूद केल्याप्रमाणे दोन वर्षे अगोदर शुल्क प्रस्तावित करता येईल.";

(२) पोट-कलम (४) मधील, " विचारार्थ पाठविण्यात आलेली बाब प्रलंबित असताना" या मजकुराने सुरू होणा-या आणि " मुभा असेल " या मजकुराने संपणा-या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" विचारार्थ पाठविण्यात आलेली बाब प्रलंबित असताना, व्यवस्थापनास विभागीय शुल्क नियामक समितीचा अंतिम निर्णय येईपर्यंत, मागील विद्याविषयक वर्षाचे शुल्क अधिक अशा शुल्कात पंधरा टक्के वाढ एवढे शुल्क, किंवा प्रस्तावित वाढीव शुल्क, यांपैकी जे कमी असेल ते, शुल्क गोळा करता येईल. " ;

(३) पोट-कलम (४) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, पोट-कलम (४) अन्वये ठरविण्यात आलेले शुल्क हे, व्यवस्थापनाने पालकांकडून गोळा केलेल्या शुल्काहून अधिक असेल तर अशा बाबतीत, पालकांकडून कोणतेही शिक्षार्थ व्याज वसूल करण्यात येणार नाही. " ;

(४) पोट-कलम (५) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (५) जर,

(क) व्यवस्थापन, कार्यकारी समितीच्या निर्णयाने व्यथित झाले असेल तर त्यास कार्यकारी समितीचा निर्णय प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, विभागीय शुल्क नियामक समितीकडे अपील दाखल करता येईल ;

(ख) कार्यकारी समितीच्या निर्णयामुळे किंवा व्यवस्थापनाने वाढविलेल्या शुल्कामुळे, पालक व्यथित झाले असतील तर, व्यथित पालकांच्या गटास, कार्यकारी समितीचा किंवा शाळा व्यवस्थापनाचा निर्णय प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, अपील दाखल करण्यासाठी अधिकृत असणा-या प्रत्येक व्यथित पालकाने यथोचितरीत्या स्वाक्षरी केलेल्या नमुन्यासह, असे अपील विभागीय शुल्क नियामक समितीकडे दाखल करता येईल :

परंतु, एखादे अपील किंवा निर्देशित प्रकरण वेळेच्या आत दाखल करण्यात न आल्याबद्दल पुरेशी कारणे आहेत, अशी जर विभागीय शुल्क नियामक समितीची खात्री पटली तर, तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरही पण साठ दिवसांच्या आत, असे अपील किंवा निर्देशित प्रकरण, विभागीय शुल्क नियामक समितीस दाखल करून घेता येईल.".

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मध्ये, पोट-कलम (६) मधील, खंड (छ) नंतर, पुढील परंतुक जादा करण्यात येईल :— सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ८ ची सुधारणा.

" परंतु, खंड (छ) च्या प्रयोजनार्थ, कोणत्याही शैक्षणिक संस्थेचा किंवा व्यवस्थापनाचा सर्वसाधारण सदस्य किंवा सल्लागार असलेली कोणतीही व्यक्ती, विभागीय शुल्क नियामक समितीचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नियुक्त होण्यास अनर्ह ठरणार नाही. " .

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मध्ये, पोट-कलम (१) मधील, सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ९ ची सुधारणा.

(१) खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (क-१) जर शाळेची इमारत भाड्याची असेल किंवा भाडेपट्ट्याने घेतली असेल तर, नोंदणीकृत करारानुसार किंवा भाडेपट्ट्यानुसार असलेले असे भाडे, किंवा वाजवी भाडे :

परंतु, जर असे भाडे अवाजवी असल्याचे दिसून आले तर, सिद्ध गणकानुसार किंवा बाजारभावानुसार असलेले भाडे विचारात घेण्यात येईल ; " ;

(२) खंड (ख) मध्ये, " पायाभूत सोयीसुविधा " या मजकुराऐवजी " पायाभूत सोयीसुविधांसाठीचा त्या वर्षातील खर्च " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (८) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम १० ची सुधारणा.

" (९) कार्यकारी समिती किंवा व्यथित पालकांचा गट किंवा व्यवस्थापन यांच्याकडून लेखी विनंती किंवा निवेदन मिळाल्यानंतर, अपवादात्मक प्रकरणांमध्ये किंवा त्याची कारणे नमूद केल्यानंतर, विभागीय नियामक शुल्क समितीला या कलमान्वये मंजूर केलेल्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार असेल :

परंतु, विभागीय नियामक शुल्क समिती, या पोट-कलमान्वये कोणताही आदेश मंजूर करण्यापूर्वी कार्यकारी समितीला किंवा व्यथित पालकांच्या गटाला किंवा, यथास्थिति, व्यवस्थापनाला त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल. " .

९. मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मध्ये,— सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम १६ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (१) मध्ये, खंड (क) मधील " रकमेच्या दुप्पट " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(२) पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (४) शासनास या अधिनियमान्वये खटला सुरू करण्याच्या प्रयोजनार्थ, किंवा अपराध आपसात मिटविण्यासाठीची कार्यवाहीस सुरू करण्याच्या प्रयोजनार्थ कोणताही अधिकारी प्राधिकृत करता येईल. " .

शंका निरसन. **१०.** शंकानिरसनासाठी, याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, या अधिनियमाद्वारे केलेल्या सुधारणा या जेथे व्यवस्थापनाने किंवा शाळेने मुख्य अधिनियमाच्या विद्यमान तरतुदींअन्वये विद्याविषयक वर्षामध्ये, शुल्कासाठी यापूर्वीच मान्यता घेतलेली आहे, प्रवेश प्रक्रिया किंवा त्याच्याशी संबधित कोणतीही इतर कार्यवाही सुरू केलेली आहे तेथे, अशा व्यवस्थापनाला किंवा शाळेला लागू असणार नाहीत.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

गुणवान व गरीब विद्यार्थ्यांमधील वैफल्यास कारणीभूत ठरणा-या शिक्षण क्षेत्रातील अनिष्ट प्रथा व बाजारीकरण यांना प्रभावी रीतीने आळा घालण्याच्या आणि शिक्षणाचा दर्जा सर्वोत्तम करण्याच्या उद्देशाने, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ (२०१४ चा महा. अधि. क्र. ७) हा अधिनियमित करण्यात आलेला आहे. अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, शासनाला विवक्षित अडचणींचा सामना करावा लागला होता आणि शाळा व्यवस्थापनाने केलेल्या फी-वाढीविरोधात अपील किंवा तक्रार दाखल करण्याची संधी विद्यार्थ्यांच्या पालकांना देण्यात आली नव्हती, असे निदर्शनास आले होते. या अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीतील अडचणींचा बिमोड करण्याच्या आणि पालकांना वाजवी संधी देण्याच्या उद्देशाने, उक्त अधिनियमात योग्य त्या सुधारणा करणे, शासनास इष्ट वाटते.

२. ज्या तरतुदी करण्यात यावयाच्या आहेत त्या पुढे स्थूलमानाने स्पष्ट केलेल्या आहेत :-

(क) पूर्व-प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत गरजा या प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत गरजांपेक्षा भिन्न आहेत आणि पूर्व-प्राथमिक शिक्षणाकरिता स्वतंत्र अधिनियम करण्याचे काम प्रगतीपथावर आहे, त्यामुळे ज्यामध्ये "पूर्वप्राथमिक शाळा" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे असा उक्त अधिनियमाच्या कलम २ चा उप-खंड (थ) वगळणे आणि इतर संबंधित तरतुदींमध्येदेखील सुधारणा करणे प्रस्तावित केलेले आहे ;

(ख) व्यथित पालकांच्या गटाला शाळा व्यवस्थापनाने अथवा कार्यकारी समितीने घेतलेल्या फी-वाढीच्या निर्णयाविरोधात अपील दाखल करण्याची संधी मिळावी या उद्देशाने, कलम २ च्या उप-खंड (क-१) मध्ये व्यथित पालकांच्या गटाची व्याख्या समाविष्ट करण्यात आली असून त्याबाबतच्या संबध्द तरतुदी करण्यात आल्या आहेत ;

(ग) "शुल्क" या संज्ञेच्या व्याखेमधील संभ्रम दूर करण्याच्या आणि त्या व्याख्येमध्ये सुस्पष्टता आणण्याच्या हेतूने, कलम २ च्या उप-खंड (ञ) मधील "शुल्क" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये सुधारणा केली आहे ;

(घ) पालक आणि शाळा व्यवस्थापन यांना मासिक किंवा द्विमासिक किंवा त्रैमासिक तत्त्वावर शुल्क भरणे किंवा वसूल करणे सोईस्कर व्हावे याकरिता, कलम ३क (१) मध्ये तरतूद करण्यात आली आहे आणि जर पालकांकडून शुल्क भरण्यास विलंब झाला तर, कलम ३क (२) मध्ये विलंबित प्रदानासाठीच्या आकाराबाबतची तरतूद केली आहे ;

(ङ) शाळा व्यवस्थापनाच्या सदस्यांपेक्षा पालकांमधून अधिक प्रमाणात सदस्य निवडून यावेत म्हणून, कलम ४ (२) मध्ये सुधारणा केलेली आहे ;

(च) शाळा व्यवस्थापनास प्रवेश प्रक्रियेपूर्वी इयत्तानिहाय शुल्क संरचना घोषित करणे शक्य व्हावे याकरिता, कलम ६ मध्ये सुधारणा केलेली आहे ;

(छ) ज्याद्वारे शुल्क वाढवता येईल अशी टक्केवारी आणि ज्याकरिता शुल्क लागू असेल तो कालावधी याबाबत तरतूद करण्याच्या उद्देशाने, कलम ६ मध्ये सुधारणा केलेली आहे ;

(ज) शाळा व्यवस्थापनास, अकल्पित प्रसंगी शुल्क-संरचनेच्या पलीकडे शुल्क वाढवणे शक्य व्हावे म्हणून, कलम ६ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे ;

(झ) शाळा व्यवस्थापन जर कार्यकारी समितीच्या निर्णयाने व्यथित झाले असेल तर त्यास, तसेच पालक जर एकतर कार्यकारी समितीच्या किंवा शाळा समितीच्या निर्णयाने व्यथित झाले असतील तर त्यांना, त्या निर्णयाविरोधात विभागीय शुल्क नियामक समितीकडे अपली दाखल करणे शक्य व्हावे या उद्देशाने, कलम ६ मध्ये सुधारणा केलेली आहे ;

(ञ) शुल्क निश्चितीच्या प्रयोजनार्थ, नोंदणीकृत करारानुसार किंवा भाडेपट्ट्यानुसार इमारतीचे भाडे भरणे हा घटक पात्र असेल हे कलम ९(१) (क-१) मध्ये प्रस्तावित केलेले आहे, तसेच कलम ९ (२) (ख) मध्येदेखील आणखी सुधारणा प्रस्तावित केलेली आहे ;

(ट) विभागीय शुल्क नियामक समितीला कार्यकारी समितीकडून किंवा व्यथित पालकांच्या गटाकडून किंवा शाळा व्यवस्थापनाकडून लेखी विनंती अथवा निवेदन मिळाल्यावर, तिच्या स्वतःच्या आदेशाचे पुनर्विलोकन करणे शक्य व्हावे या उद्देशाने, कलम १० (९) मध्ये तरतूद करण्यात आली आहे ;

(ठ) शासनाला या अधिनियमान्वये खटला सुरू करण्याच्या प्रयोजनार्थ, किंवा अपराध आपसात मिटवण्यासाठीची कार्यवाही सुरू करण्याच्या प्रयोजनार्थ, कोणताही अधिकारी प्राधिकृत करता यावा याकरिता, कलम १६ (४) मध्ये तरतूद केली आहे.

वरिल उद्दिष्टे साध्य करणे, हा या विधेयकाचा उद्देश आहे.

नागपूर,
दिनांक १८ जुलै, २०१८.

**विनोद तावडे,**
शालेय शिक्षण मंत्री.

**वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन**

या विधेयकामध्ये वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड ३.—** या खंडान्वये, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ यामध्ये, नवीन कलम ३क समाविष्ट करणे हा हेतू असून, त्याद्वारे शिक्षार्थ व्याजाचा दर, आदेशाद्वारे निश्चित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा उपरोल्लिखित प्रस्ताव हा, सामान्य स्वरुपाचा आहे.

**विधान भवन :**
नागपूर,
दिनांक १९ जुलै, २०१८.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C. DIRECTOR, SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD PRINTED AT GOVERNMENT PRESS, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.